# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०१ जुलै, २०२५ / आषाढ १०, १९४७ (शके)**

**(१) महसूल मंत्री**
**(२) वने मंत्री**
**(३) आदिवासी विकास मंत्री**
**(४) कृषी मंत्री**
**(५) सामाजिक न्याय मंत्री**
**(६) रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री**
**(७) मदत व पुनर्वसन मंत्री**
**(८) मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २८**

---

### मौजा देऊरवाडा (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील वर्धा नदीच्या किनाऱ्यावर रेतीचा अवैधरित्या साठा करून वाहतूक होत असल्याबाबत

**(१) * ३०४२ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा देऊरवाडा (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील वर्धा नदीकाठच्या परिसरात अवैधपणे रेतीचा साठा करून मोठ्या प्रमाणावर रेतीची वाहतूक करण्यात येत असल्याची बाब दिनांक २७ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून, सदर रेती तस्करीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी घटनास्थळाची पाहणी करुन या अवैध रेती उत्खनन व वाहतुकीत स्थानिक प्रशासनातील उपविभागीय अधिकारी (आर्वी), तहसिलदार (आर्वी), उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस निरीक्षक (आर्वी) यांचा सहभाग असल्याने त्यांची बदली करण्याबाबतचे निवेदन मा.महसूल मंत्री तसेच पोलीस महानिरीक्षक (नागपूर) यांना दिनांक २८ एप्रिल, २०२५ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्धा नदीघाटामध्ये अवैध रेती उत्खनन व वाहतुकीस मदत करणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) मौजा देऊरवाडा, ता.आर्वी येथे रेतीच्या अवैध आढळून आलेली ६६ ब्रास रेती व त्यासाठी वापरण्यात आलेले साहित्य जप्त करून तहसिलदार कार्यालय, आर्वी येथे जमा करण्यात आले आहे. याप्रकरणी पोलीस स्टेशन, आर्वी येथे अप क्रमांक ३८८/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) व ६२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात अला आहे.

विधानपरिषद सदस्य यांच्याकडून शासनास प्राप्त झालेल्या पत्राच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, वर्धा यांना "नियमानुसार तपासून कार्यवाही करण्याबाबत" कळविण्यात आले आहे. याबाबत जिल्हाधिकारी, वर्धा यांचा अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

सदर गुन्ह्याच्या चौकशीत अवैध रेती उत्खनन व वाहतूकीस मदत करणारे कोणीही संबंधित अधिकारी व कर्मचारी दोषी आढळून आले नसल्याचा पोलीस अधीक्षक, वर्धा यांचा अहवाल आहे.

(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील पीक विमा कंपन्यांना कोट्यवधी रुपयांचा नफा झाल्याबाबत

**(२) * २८९० श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सचिन अहिर, श्री.अरुण लाड, श्री.संजय खोडके, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पीक विमा योजनेंतर्गत गेल्या ५ ते ८ वर्षांत खाजगी विमा कंपन्यांना हजारो कोटी रुपयांचा नफा झाला असून शेतकऱ्यांना मात्र फारच कमी प्रमाणात भरपाई देण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विमा अर्ज भरतानाही शेतकऱ्यांना १ रुपयाच्या योजनेत प्रत्यक्षात सीएससी केंद्रांवर सीएससी चालकास ४० रुपये शुल्क शासनातर्फे दिले जात असून शासनाने अशा शुल्कासाठी १०० कोटींहून अधिकची रक्कम वितरित केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना अधिक फायदेशीर ठरेल यादृष्टीने बदल करण्यासाठी कार्यवाही करण्याबाबत तसेच सदरहू योजनेत अवाजवी नफेखोरी करणाऱ्या विमा कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**अॅड. माणिकराव कोकाटे :** (१) सन २०१६-१७ ते सन २०२३-२४ या कालावधीत प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत एकूण रुपये ४३२०१.३३ कोटी इतक्या रकमेचा विमा हप्ता जमा झालेला असून, शेतकऱ्यांना दिलेल्या नुकसान भरपाईची रक्कम रुपये ३२६२९.७३ कोटी इतकी आहे. या कालावधीत विमा कंपन्यांना रुपये ७१७३.१४ कोटी इतका नफा झाला आहे.

(२) नाही. प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या अर्ज नोंदणीकरीता प्रति अर्ज रुपये ४०/- इतके शुल्क संबंधित विमा कंपनीकडून सी.एस.सी. चालकास परस्पर देण्यात येते. राज्य शासनाकडून सी.एस.सी चालकास कोणतेही शुल्क अदा करण्यात येत नाही.

(३) सन २०२५-२६ च्या खरीप हंगामापासून राज्यात, "सर्वसमावेशक पीक विमा योजनेमध्ये" बदल करून, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार, खरीपासाठी २%, रब्बीसाठी १.५% व नगदी पिकांना ५% असा शेतकरी हिस्सा घेवून, उर्वरीत पीक विमा हप्ता हा केंद्र शासन व राज्य शासन यांच्यामार्फत देऊन, पीक कापणी प्रयोगांवर आधारित, "सुधारित पीक विमा योजना" राबविण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात नैसर्गिक आपत्तीमुळे मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई देणेबाबत

**(३) * २६५२ श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, ॲड.अनिल परब, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अरुण लाड, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सुनिल शिंदे, श्री.हेमंत पाटील, श्री.दादाराव केचे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्री.संजय केणेकर, श्री.संजय खोडके :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उत्तर महाराष्ट्र, मध्य महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ व कोकण विभागातील ठाणेसह पालघर, मुंबई, सिंधुदुर्ग व रत्नागिरी तसेच जळगाव, बुलढाणा, वाशिम, बीड, हिंगोली, नांदेड, धाराशीव, नाशिक, भंडारा, यवतमाळ, लातूर, परभणी, कोल्हापूर, वर्धा सह रावेर व इतर भागात माहे मार्च, एप्रिल व मे, २०२५ मध्ये वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसामुळे, गारपीटी व वीज पडून झालेल्या नैसर्गिक आपत्तींमुळे आंबा, द्राक्ष, सफरचंद, पपई, काजू, खरबूज, टरबूज तसेच भाजीपाल्यासह गहू, कांदा, हरभरा, मका, ज्वारी, बाजरी, भाजीपाला, हळद इत्यादी शेती व फळपिकांचे मोठ्या प्रमाणावर जीवित आणि मालमत्तेचे नुकसान झाल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वादळी पावसात वीज कोसळून मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, बीड, हिंगोली, परभणी, नांदेड, धाराशीव या जिल्ह्यातील ४ नागरिकांचा, विदर्भातील भंडारा येथे २, वाशिम व यवतमाळमध्ये १ तसेच ठाणे जिल्ह्यात इमारत दुर्घटना, वीज व झाड पडून १६ नागरिकांचा व कल्याण येथे झाड कोसळून ३ नागरिकांचा मृत्यू झाला असून गाय, म्हैस अशा ३ पशुधनाचा मृत्यू झाल्याचे तसेच जालना जिल्ह्यात एका २४ वर्षीय तरुणाचा वीज पडून, बुलढाणा जिल्ह्यात कापसाची वेचणी करत असताना एका महिलेच्या अंगावर वीज पडून तर नाशिक जिल्ह्यातही दोन जणांचा वीज पडून मृत्यू झाल्याचे तसेच राज्यात अन्य ठिकाणीही वीज पडून अनेक नागरिक मृत्यूमुखी व पशुधनाची हानी झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर जिल्ह्यातील ८ तालुक्यात झालेल्या वादळी वारा व पावसामुळे ८०९ घरांचे नुकसान झाले असून त्यामध्ये डहाणू तालुक्यात २३० घरांचे, वाडा तालुक्यात ९२ घरांचे, वसई तालुक्यात ७१, जव्हार तालुक्यात ८९, मोखाडा तालुक्यात ८७, पालघर तालुक्यात ८५, विक्रमगड तालुक्यात ९२ घरांचे व तलासरी भागात ६३ घरांचेही नुकसान झाल्याचे तसेच ठाणे जिल्ह्यातील सर्वच तालुक्यातील इमारतीसह १०७ घरांची पडझड होऊन अनेक नागरिक बेघर झाल्याची बाब माहे मे, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात व त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, धाकटी डहाणू (ता.डहाणू, जि.पालघर) येथे ५० बोटींचे नुकसान झाल्याने उपजिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी, डहाणू, मत्स्य विभागाचे सहाय्यक आयुक्त, डहाणू, तहसिलदार यांनी नुकसानग्रस्त भागाला भेट देऊन नुकसानीचा आढावा घेऊन झालेल्या नुकसानीची पाहणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने नैसर्गिक आपत्तींमुळे राज्यातील नुकसानग्रस्त भागांमध्ये तात्काळ पाहणी व पंचनामे करण्याबाबत तसेच मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट १०० टक्के नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच पालघर जिल्ह्यातील आठ तालुक्यात ८०९ नुकसानग्रस्त घरांची व धाकटी डहाणू येथील नुकसान झालेल्या ५० बोटींची भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील) :** (१) व (२) माहे मार्च, एप्रिल व मे, २०२५ मध्ये राज्यात अवकाळी पाऊस वादळी वाऱ्यामुळे वीज पडून शेतीपिकांचे तसेच जिवीत हानी आणि मालमत्तेचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे झालेले मृत व्यक्ती तसेच मृत जनावरांबाबत अनुदान तातडीने व वेळेवर वाटपाकरीता (-) उणे प्राधिकार पत्रावर देयक सादर करण्याची सुविधा शासनाकडून देण्यात आली आहे व काही ठिकाणी अनुदान वाटप देखील केले आहे. तर काही ठिकाणी अनुदान वाटपाबाबत कार्यवाही तहसिल स्तरावर सुरु आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून कल्याण येथील इमारतीचा स्लॅब कोसळून मृत झालेल्या व्यक्तींच्या वारसांना ही मदत देण्यात आली आहे.
(३) पालघर जिल्ह्यात एप्रिल व मे, २०२५ मध्ये घर/झोपड्यांचे तालुकानिहाय नुकसान झाल्याचा तपशिल प्रपत्र "अ" मध्ये सोबत जोडला आहे.

सदर घरांच्या दुरूस्ती/पुनर्बांधणी करीता आपत्तीग्रस्तांना तातडीने आर्थिक मदत करण्यासाठी अनुदान वितरीत करण्यात आले असून जिल्हा/तालुका स्तरावर वाटपाची प्रक्रिया सुरू आहे.
(४), (५) व (६) शेतीपीक नुकसानीचे पंचनामे तातडीने करून मदत वितरणाबाबत शासनाने सूचना दिलेल्या आहेत. तसेच शेतकऱ्यांच्या पीक नुकसानीबाबत व बोटींच्या नुकसानीबाबत मदत देण्यासंदर्भात शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

घरांची दुरूस्ती / पुनर्बांधणीसाठी आर्थिक मदत वितरीत करण्यात आलेली आहे.

**प्रपत्र अ**

पालघर जिल्ह्यात दिनांक ४ ते ६ एप्रिल, २०२५ या कालावधीमध्ये अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे खालीलप्रमाणे नुकसान झालेले आहे.

| अ.क्र. | तालुका | पूर्णत: नष्ट झालेली पक्की घरे | पूर्णत: नष्ट झालेली कच्ची घरे | अंशत: नष्ट झालेली पक्की घरे | अंशत: नष्ट झालेली कच्ची घरे | नष्ट झालेली झोपड्या | नष्ट झालेले गोठे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वाडा | ० | ० | ९२ | १११ | १ | १ |
| २ | विक्रमगड | ० | ० | २ | ३ | ० | ० |
| ३ | जव्हार | ० | ० | १२ | ० | ० | ० |
| ४ | मोखाडा | ० | १ | १११ | ८ | ० | २ |
| | एकूण | ० | १ | २१७ | १२२ | १ | ३ |

पालघर जिल्ह्यात दिनांक ६ ते ८ मे, २०२५ या कालावधीमध्ये अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे खालीलप्रमाणे नुकसान झालेले आहे.

| अ.क्र. | तालुका | पूर्णत: नष्ट झालेली पक्की घरे | पूर्णत: नष्ट झालेली कच्ची घरे | अंशत: नष्ट झालेली पक्की घरे | अंशत: नष्ट झालेली कच्ची घरे | नष्ट झालेली झोपड्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पालघर | ० | ० | १०२ | ४४८ | ० |
| २ | वसई | ० | ० | ८७ | ० | ० |
| ३ | डहाणू | १ | २ | ५९७ | ५१ | ० |
| ४ | तलासरी | ० | ० | ७२ | ५५ | ० |
| ५ | वाडा | ० | ० | ९५ | ४७ | ० |
| ६ | विक्रमगड | ० | ० | १७८ | २८ | ३ |
| ७ | जव्हार | ० | ० | २०१ | ० | १ |
| ८ | मोखाडा | ० | १ | १२९ | ३० | ० |
| | एकूण | १ | ३ | १४६१ | ६५९ | ४ |

-----------------

## रत्नागिरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नैसर्गिक आगीत झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याबाबत

**(४) * २२७२ श्री.सुनिल शिंदे, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.योगेश टिळेकर, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यात आंबा व काजू बागायती भागात व डोंगराळ परिसरात वणवा लागण्याच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाल्याने आंबा, काजू, सुपारी, ऊस यासारख्या महत्त्वाच्या फलोत्पादन व शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून संबंधित शेतकरी यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे दिनांक २ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारच्या नैसर्गिक आगीत नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच अशा बागांचे व पिकांचे वणव्यापासून संरक्षण करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील) :** (१) व (२) रत्नागिरी जिल्ह्यामध्ये माहे एप्रिल व मे, २०२५ मध्ये विविध ठिकाणी नैसर्गिक आग लागून फळपिकांचे नुकसान झाल्याच्या घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे. तद्नुषंगाने आंबा, काजू, सुपारी, ऊस यासारख्या पिकांच्या नुकसानीबाबत क्षेत्रिय स्तरावर पंचनाम्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी विभागांतर्गतच्या अनुदानित शाळांना वेतनेतर अनुदान देण्याबाबत

**(५) * २५३५ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शालेय शिक्षण विभागातर्फे परवानगी देण्यात येणाऱ्या शाळांना अनुदानाच्या निकषानुसार १०० टक्के अनुदान प्राप्त होत असून आदिवासी विभागाअंतर्गत येणाऱ्या शाळांना फक्त वेतन अनुदान देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या शाळेत डिजीटल बोर्डाचा वापर, बायोमॅक्ट्रिक सुविधा, संगणक प्रिंटर, संगणक लॅब, सीसीटीव्ही, भौतिक सोयीसुविधा इत्यादींसाठी विजेचा मोठ्या प्रमाणात वापर होत असून विदयुत देयके शाळेला व्यावसायिक दराने भरावे लागत असल्याने त्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक निधीची गरज लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शालेय शिक्षण विभागाच्या धर्तीवर आदिवासी विभागाअंतर्गत येणाऱ्या शाळांना वेतन अनुदानासोबत वेतनेत्तर अनुदान भूतलक्षी प्रभावाने उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

राज्यातील आदिवासी विकास विभागांतर्गत, स्वयंसेवी संस्थाद्वारा संचलित अनुदानित आश्रमशाळांना वेतन अनुदानाव्यतिरिक्त परिपोषण अनुदान, आकस्मिक वेतनेतर अनुदान तसेच भाड्याने घेतलेल्या इमारतींचे वाजवी भाड्याच्या ७५ % भाडेदेखील देण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागभीड (जि.चंद्रपूर) तालुक्यात अवैधरित्या रेती उपसा होत असल्याबाबत

**(६) * २८६१ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावरगाव, चिखलगाव, वाढोणा व तळोधी (ता.नागभीड, जि.चंद्रपूर) येथील रेती माफिया, स्थानिक पोलीस आणि महसूल अधिकारी यांच्या संगनमताने रात्रीच्या वेळी रेती घाटांमधून अवैधरित्या रेती उपसा करून बाजारात चढ्या दराने विक्री करत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रेती घाटांचा मागील तीन वर्षांपासून लिलाव न झाल्यामुळे नागभीड तालुक्यामध्ये शासनाच्या विविध योजनांतर्गत मंजूर घरकुल बांधकामांसाठी आवश्यक रेती उपलब्ध न झाल्याने संबंधित घरकुलांची कामे अपूर्ण आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अवैधरित्या रेती उपसा करणाऱ्या रेती माफियांवर तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित पोलीस व महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच शासनाच्या योजनांतर्गत मंजूर घरकुलांच्या कामासाठी रेती उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.
(२) नागभीड तालुक्यात शासनाच्या विविध योजना अंतर्गत २०३९ घरकूल लाभार्थी यांना बांधकामाकरीता ८४६९ ब्रास रेतीची मागणी तहसिलदार यांच्याकडे प्राप्त झालेली आहे. त्याअनुषंगाने लगतच्या ब्रम्हपुरी तालुक्यातील रेती घाटातून नागभीड तालुक्यातील विविध योजनाअंतर्गत मंजूर घरकूल बांधकामासाठी रेती उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) नागभिड तालुक्यातील प्रमूख पाच मार्गावर गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्याची पथके तयार करण्यात आलेली आहेत. चालू आर्थिक वर्षात अवैध गौण खनिज वाहतुकीच्या एकूण सात प्रकरणात रुपये ११,७४,०००/- दंडात्मक रकमेची वसूली केली आहे. पोलीस विभागामार्फत पाच प्रकरणात फौजदारी कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कृषी विभागातील गट-अ ते गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(७) * २३५६ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अरुण लाड, श्री.एकनाथराव खडसे, श्री.संजय खोडके :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कृषी विभागाच्या विविध आस्थापनांवर २७,५०२ पदे मंजूर असून त्यापैकी फक्त १८,३६९ कर्मचारी कार्यरत आहेत आणि उर्वरित ९,१३३ पदे रिक्त असून या रिक्त पदांमध्ये संचालक, कृषी सहसंचालक, प्रशासकीय अधिकारी, लेखा अधिकारी, कृषी अभियंता अशा महत्त्वाच्या पदांसह प्रत्यक्ष शेतकऱ्यांशी संपर्कात असणारे गट-क मधील ५,५६५ आणि गट-ड मधील नाईक, शिपाई १९८९, क्लीनर, माळी ५५९, प्रशिक्षित मजुर २९९, मदतनिस, चालक व परिचरांचीही पदे भरण्यात आलेली नसल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जळगाव जिल्ह्यातील कृषी विभागांतर्गत उपविभागीय कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक, कृषी सहायक, अनुरेखक, वाहन चालक, नाईक, शिपाई, रोपमाळा मदतनीस अशी सुमारे ४९९ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील कृषी विभागाच्या विविध आस्थापनांवर मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असल्यामुळे सध्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण पडत असल्याने शेतकऱ्यांना वेळेवर सल्ला व सेवा मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील कृषी विभागाच्या विविध आस्थापनांवरील रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) हे खरे आहे.

राज्यातील कृषी विभागाच्या विविध आस्थापनांवर २७,५०२ पदे मंजूर आहेत. माहे, मे अखेरपर्यंत १८२९८ पदे भरलेली असून ९२०४ पदे रिक्त आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

जळगाव जिल्ह्यासाठी उपविभागीय कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक, कृषी सहायक, अनुरेखक, वाहन चालक, नाईक, शिपाई, रोपमाळा मदतनीस या संवर्गाची एकूण ९२७ पदे मंजूर असून, त्यापैकी माहे, मे अखेरपर्यंत ५५७ पदे भरलेली आहेत. ३७० पदे रिक्त आहेत. वित्त विभागाच्या दिनांक ३१/१०/२०२२ च्या शासन निर्णयान्वये वाहनचालक व गट-ड संवर्गातील पदे भरण्यास निर्बंध आहेत. तसेच, अनुरेखक हे पद व्यपगत संवर्ग आहे.

(३) हे खरे नाही.

सध्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांकडे अतिरिक्त कार्यभार सोपवून शेतकऱ्यांना सल्ला व सेवा पुरविण्यात येत आहेत.

(४) महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब या संवर्गातील एकूण १५ पदे व महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब (कनिष्ठ) या संवर्गातील ७२ पदे अशा एकूण ८७ पदांचे मागणीपत्र तसेच लिपिक संवर्गातील एकूण २१५ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्याकरीता प्रस्ताव वित्त विभागाच्या उप समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य कृषी सहायक संघटनेच्या विविध मागण्यांबाबत

**(८) * ३४१७ श्री.संजय खोडके, श्री.विक्रम काळे, श्री.सत्यजीत तांबे, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.धीरज लिंगाडे, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य कृषी सहायक संघटनेने कृषी सहायकांच्या पदोन्नती, नियमित नियुक्ती, पदनाम बदल, सेवाविषयक सुधारणा, डिजिटल साधनांची उपलब्धता, कार्यालयीन कामकाजासाठी लॅपटॉप, मदतनीस व वाहतूक भाड्याची तरतूद तसेच आकृतीबंधास मंजुरी देऊन कृषी पर्यवेक्षक पदे वाढविणे इत्यादी अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागण्यांसाठी राज्यभरातील तालुका कृषी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केल्याचे माहे मे, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी सहायकांना डिजिटल सक्षमीकरणासाठी अद्ययावत सुविधा तसेच लॅपटॉप देण्यात येत नसल्यामुळे 'ई-नाम', 'महाडीबीटी', 'शेतकरी नोंदणी' यांसारख्या योजनांच्या अंमलबजावणीमध्ये अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १० फेब्रुवारी, २०२५ रोजी झालेल्या बैठकीनंतरही कृषी सहायकांच्या १५ मागण्यांवर अद्याप निर्णय घेण्यात आलेला नाही तसेच सातारा जिल्ह्यातील ३५० सहायक बेमुदत काम बंद आंदोलनात सहभागी झाल्याने त्याचा परिणाम कामावर झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कृषी सहायकांच्या पदोन्नती, नियमित नियुक्ती, सेवाविषयक सुधारणा, डिजिटल सक्षमीकरणासाठी डिजिटल साधनांची उपलब्धता इत्यादी विविध मागण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

कृषी विभागाची विविध क्षेत्रिय कामे IT Applications च्या माध्यमातून तांत्रिक विनिर्देश असलेला मोबाईल वरुनही करण्यात येतात. सदर Applications चालविण्यासाठी आवश्यक असलेला Internet data खरेदी करण्यासाठी विविध योजनातून क्षेत्रिय कर्मचाऱ्यांस प्रतिमहिना रुपये ५००/- data charges देण्यात येतात. मात्र क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी संघटनांनी वेळोवेळी मागणी केल्यानुसार त्यांना लॅपटॉप उपलब्ध करुन देण्याबाबत शासनस्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.
(३) व (४) हे अंशत: खरे आहे.

दिनांक ०५/०६/२०२५ च्या शासन निर्णयान्वये कृषी पर्यवेक्षक व कृषी सहायक यांचे पदनाम अनुक्रमे "उप कृषी अधिकारी" व "सहायक कृषी अधिकारी" असे करण्यात आले आहे.

कृषी सहायकांच्या मुख्य मागण्या शासनाने मान्य केल्याने, कृषी सहायक संघटनेने दिनांक २७ मे, २०२५ पासून काम बंद आंदोलन मागे घेतले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये वाढ झाल्याबाबत**

**(९) * २७०२ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.विक्रम काळे, श्री.संजय खोडके, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिवसेंदिवस शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढत असून विशेषतः पश्चिम विदर्भातील जिल्ह्यांमध्ये माहे मार्च, २०२५ अखेरपर्यंत एकूण २५१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद करण्यात आली असून, त्यापैकी यवतमाळ जिल्ह्यात ८१, अमरावती जिल्ह्यात ५०, अकोला जिल्ह्यात ४८, बुलढाणा जिल्ह्यात ४२ व वाशिम जिल्ह्यात ३० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे तसेच मराठवाड्यातील हिंगोली जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र सुरुच असून प्रत्येक महिन्यात किमान ५ शेतकरी आत्महत्या करित असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.सदस्यांनी माहे मार्च, २०२५ मधील अधिवेशनात केलेल्या मागणीनुसार प्राणी हल्ल्यात मृत्यू पावलेल्यांच्या वारसांना मिळणाऱ्या मदतीच्या धर्तीवर शेतकरी आत्महत्या प्रकरणांतील कुटुंबियांना मदत देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात दिवसेंदिवस शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रमाणात वाढ होत असून माहे मार्च, २०२५ अखेरच्या स्थितीनुसार पात्र ठरविण्यात आलेल्या शेतकऱ्यांच्या वारसांना अद्याप शासकीय आर्थिक मदत मिळण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नैराश्येतेतून होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी सामाजिक संस्थेमार्फत समुपदेशन कार्यक्रम राबविण्याकरीता तसेच पात्र ठरविण्यात आलेल्या शेतकऱ्यांच्या वारसांना व कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबात शासनामार्फत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील) :** (१) पश्चिम विदर्भातील यवतमाळ, अमरावती, अकोला, बुलढाणा व वाशिम जिल्ह्यांमध्ये माहे जानेवारी ते मार्च, २०२५ अखेरपर्यंत २५७ आत्महत्यांची प्रकरणे निदर्शनास आली असून त्यापैकी ७६ प्रकरणे शासन निर्णयामधील निकषानुसार मदतीसाठी पात्र तर ७४ प्रकरणे अपात्र ठरली आहेत. तसेच १०७ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत. पात्र ७६ प्रकरणांपैकी ७१ प्रकरणी मदत देण्यात आलेली आहे. उर्वरित प्रकरणी मदत देण्याची कार्यवाही सुरू आहे.

हिंगोली जिल्ह्यात जानेवारी ते मे, २०२५ अखेरपर्यंत आत्महत्यांची २४ प्रकरणे निदर्शनास आली असून त्यापैकी १३ प्रकरणे शासन निर्णयामधील निकषानुसार मदतीसाठी पात्र तर ५ प्रकरणे अपात्र ठरली आहेत. तसेच ६ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत. पात्र १३ प्रकरणी मदत देण्यात आलेली आहे.

(२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक २३/०१/२००६ अन्वये शेतकऱ्यांच्या आत्महत्या प्रकरणी रुपये १.०० लक्ष इतकी मदत देण्यात येते. वाढीव मदत देण्याबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन नाही.

(३) राज्यात माहे जानेवारी ते मार्च, २०२५ अखेरपर्यंत आत्महत्यांची ७६७ प्रकरणे निदर्शनास आली आहेत. त्यापैकी ३७३ प्रकरणे शासन निर्णयामधील निकषानुसार पात्र ठरली तर २०० प्रकरणे अपात्र ठरली आहेत. तसेच १९४ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित असून पात्र ३७३ प्रकरणांपैकी ३२७ प्रकरणी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना आर्थिक मदत देण्यात आलेली आहे. उर्वरित प्रकरणी मदत देण्याची कार्यवाही प्रगती पथावर असून प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढण्याबाबत सर्व विभागीय आयुक्तांना कळविण्यात आलेले आहे.

(४) शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शासन स्तरावरून खालीलप्रमाणे विविध विभागामार्फत उपाययोजना करण्यात येतात.

- नैसर्गीक आपत्तीमुळे पीक नुकसान झाल्यास, मदत व पुनर्वसन कडून पीक नुकसानीबाबत मदत देण्यात येते.
- कृषी विभागामार्फत शासन परिपत्रक दिनांक ०४/०२/२०१९ अन्वये केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत रुपये ६,०००/- आणि शासन निर्णय दिनांक १५/०६/२०२३ अन्वये नमो शेतकरी महासन्मान निधीअंतर्गत रुपये ६,०००/- असे एकूण रुपये १२,०००/- वार्षिक अनुदान देण्यात येत आहे.
- आत्महत्या रोखण्याकरीता शेतकऱ्यांच्या शेत मालाला योग्य भाव मिळणे, सिंचन सोई मध्ये वाढ करणे व समुदपदेशन केंद्रे संचलित करणे इ. योजना जिल्हा स्तरावर राबविण्यात येत आहेत.
- शासन निर्णय दिनांक २४/०७/२०१५ अन्वये विविध विभागामार्फत विविध उपाययोजना राबविण्यात येतात.

- आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांसाठी शासकीय योजनांचा लाभ मिळणेबाबत शासन निर्णय दिनांक १८/०६/२०१९ अन्वये विविध विभागाकडून लाभ देण्यात येतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे परिपोषण अनुदान वाढविण्याबाबत

**(१०) * २७१५ श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनामार्फत चालविण्यात येणाऱ्या शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना व स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित वसतिगृहातील विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या परिपोषण अनुदानात तफावत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय वसतिगृहातील प्रत्येक विद्यार्थ्याला दरमाह रुपये ४,५००/- इतके व अनुदानित वसतिगृहातील विद्यार्थ्याला केवळ रुपये १,५००/- इतके परिपोषण अनुदान देण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांप्रमाणे अनुदानित वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे परिपोषण अनुदान वाढविण्याकरीता शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) होय.

(२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत शासकीय वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांना शासन निर्णय, दिनांक २६ जुलै, २०११ अन्वये निवासाची व भोजनाची मोफत व्यवस्था, क्रमीक पुस्तके, वह्या व इतर शैक्षणिक साहित्य इत्यादी सोयीसुविधा बाबत तरतुदी विहित केलेल्या आहेत. तसेच शासकीय वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांना भोजन पुरवठा करण्यासाठी शासन निर्णय, दिनांक ६ नोव्हेंबर, २०२३ अन्वये विभागनिहाय भोजन पुरवठादारांची निवड करण्यात आलेली आहे.

विभागांतर्गत स्वयंसेवी संस्था संचलित अनुदानित वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांना प्रतीमहा रुपये १५००/- इतके परिपोषण अनुदान देण्यात येत होते. सदर परिपोषण अनुदानात दिनांक १६ ऑगस्ट, २०२४ च्या शासन निर्णयान्वये वाढ करून प्रतीमहा प्रतीविद्यार्थी रुपये २२००/- इतके करण्यात आलेले आहे. स्वयंसेवी संस्था संचलित अनुदानित वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांना शासनाकडून केवळ सहाय्यक स्वरूपात अनुदान देण्यात येत असून, सदर स्वयंसेवी संस्थांनी त्यांच्याकडे उपलब्ध संसाधनामधून विद्यार्थ्यांच्या परिपोषणावर खर्च करणे अपेक्षित आहे.

(३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग दिनांक १६ ऑगस्ट, २०२४ च्या शासन निर्णयान्वये स्वंयसेवी संस्थाद्वारे संचलित अनुदानित संस्थामधील प्रवेशित विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या दरमहा दरडोई परिपोषण अनुदानात रुपये १५००/- वरुन रुपये २२००/- याप्रमाणे वाढ करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मीरा-भाईंदर (जि.ठाणे) येथील मच्छिमारांना डिझेल परतावा देणेबाबत

**(११) * २५६८ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा-भाईंदर (जि.ठाणे) येथील मच्छिमार बांधवांना सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता रुपये १५० कोटींची तरतूद करण्यात आलेली असतानाही मागील एक वर्षापासून २५ कोटी रुपयांचा डिझेल परतावा अद्याप देण्यात आला नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मीरा-भाईंदर येथील मच्छिमार बांधवांना डिझेल परताव्यासाठीची रक्कम अदा करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे :** (१) हे खरे नाही.

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात रुपये १५०.०० कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आली होती. त्यापैकी रुपये १२६.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. या रकमेपैकी रुपये १०.०३ कोटी इतका निधी, ठाणे जिल्ह्यातील मच्छिमार बांधवाना डिझेल परतावा देण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(२) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र राज्यातील यांत्रिक मासेमारी नौकांना, डिझेल तेलावरील मूल्यवर्धीत कराची प्रतिपूर्ती या योजनेंतर्गत द्यावयाच्या परताव्यासाठी रुपये १४७.७८ कोटी रकमेची तरतूद करण्यात आली आहे. या निधीमधून ठाणे जिल्ह्यातील उर्वरित प्रतिपूर्तीची रुपये ४.६० कोटी रक्कम अदा करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात रासायनिक खतांची दरवाढ कमी करण्याबाबत

**(१२) * २८३२ श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.योगेश टिळेकर, श्रीमती चित्रा वाघ, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरीप हंगामात जागतिक बाजारातील कच्च्या मालाच्या दरवाढीचे कारण देत कंपन्यांनी युरिया, डीएपी व अन्य रासायनिक खतांच्या ५० किलोच्या प्रत्येकी बॅगेच्या दरात रुपये २४० ते २४५ पर्यंत वाढ केली असून, त्यामुळे ज्वारी, बाजरी, मका यांसारख्या पिकांच्या लागवडीसाठी शेतकऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याची बाब माहे मे, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खतांचे दर नियंत्रित ठेवण्याकरीता तसेच शेतकऱ्यांवरील आर्थिक भार कमी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) नाही.

(२) खतांचे दर व त्यावरील अनुदान ही बाब केंद्रशासनाच्या अखत्यारीत आहे. अनुदानित खतांच्या किंमती कमी व्हाव्यात यासाठी खतांच्या किंमती वरील GST माफ करण्याबाबत केंद्र शासनास दिनांक ११/०२/२०२५ च्या पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील नागरिकांचे पुनर्वसन प्रलंबित असल्याबाबत

**(१३) * ३४२७ श्री.राजहंस सिंह, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती चित्रा वाघ, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीत सुमारे २ हजार आदिवासी व २५ हजार झोपडीधारक अनधिकृतपणे वास्तव्य करीत असून सदर रहिवाशांचे मरोळ-मरोशी येथील सुमारे ९० एकर जागेवर पुनर्वसन करण्याचा निर्णय शासन स्तरावर घेण्यात आला असून, सदर जागा पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रात येत असल्यामुळे प्रस्तावित पुनर्वसनास अडचणी निर्माण होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रहिवाशांच्या पुनर्वसनासाठी अन्य पर्यायी जागेचा शोध घेण्याबाबत शासनाने महसूल विभागास निर्देश दिले असून पर्यायी जागा उपलब्ध झाल्यानंतर ती म्हाडा (MHADA) कडे हस्तांतरित करण्यात येणार असल्यामुळे सद्य:स्थितीत सुमारे २७ हजार रहिवाशांचे पुनर्वसन प्रलंबित राहणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी व झोपडीधारक रहिवाशांचे पुनर्वसन संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाबाहेर सुरू असलेल्या झोपडपट्टी सुधार व पुनर्वसन (SRA) योजनेच्या माध्यमातून करण्यात यावे अशी मागणी मा.विधानपरिषद सदस्य यांनी शासनाकडे वेळोवेळी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीत असलेल्या रहिवाशांचे पुनर्वसन लवकरात लवकर करण्याकरीता शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०४/१०/२०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी पाडे व पात्र अतिक्रमणधारकांचे मौजे-मरोळ-मरोशी, न.भू.क्र.१६८९ पै, १६९० पै व १६९७ पै मधील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या ताब्यात असलेल्या १९० एकर क्षेत्रापैकी ९० एकर क्षेत्रामध्ये करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या दिनांक ०५/१२/२०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये घोषित संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्रामध्ये उक्त क्षेत्राचा समावेश आहे. दिनांक ०५/१२/२०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये पर्यावरण संवेदनशील क्षेत्रातील प्रतिबंधीत, विनियमित व प्रोत्साहीत असे वर्गीकरण करण्यात आले असून, इमारतींचे बांधकाम हे प्रयोजन विनियमित श्रेणीतील आहे. मात्र राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या दिनांक

२१/१२/२०२४ रोजी झालेल्या ८१ व्या बैठकीमध्ये संजय गांधी राष्ट्रीय उद्यान पर्यावरण संवेदनशील क्षेत्राचा झोनल मास्टर प्लॅन तयार करुन त्यास मान्यता प्राप्त करेपर्यंत पर्यावरण संवेदनशील क्षेत्रातील कोणताही प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करु नये असे निर्देश दिले आहेत.

(२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २५/०२/२०२५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये जिल्हाधिकारी, ठाणे यांनी सुचविलेल्या पर्यायी जागा पुनर्वसनाकरीता गृहनिर्माण विभागास उपलब्ध करुन देण्यात यावी. असे निर्देश देण्यात आले आहेत.

(३), (४) व (५) रिट याचिका क्र. ३०५/१९९५ मधील मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सन २००० साली पहिल्या टप्प्यात पुनर्वसनाकरीता रक्कम भरणा केलेल्या ११६५८ पात्र अतिक्रमकांपैकी ११३५९ अतिक्रमकांचे संघर्ष नगर, चांदिवली येथे पुनर्वसन करण्यात आले आहे. मात्र, सदनिकांच्या उपलब्धतेअभावी सन २००८ मध्ये रक्कम भरणा केलेल्या व प्रथमदर्शनी पात्र ठरलेल्या १३४८६ अतिक्रमकांच्या पुनर्वसनाची प्रक्रिया पूर्णत्वास जाऊ शकलेली नाही. मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील दिनांक २५/०२/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देशानूसार पुनर्वसनाकरीता पर्यायी जमीन उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही महसूल विभागाकडून प्रस्तावित असून उपलब्ध होणाऱ्या पर्यायी जमिनींच्या निश्चितीअंती त्यावर पुनर्वसन प्रकल्प राबविण्याची कार्यवाही गृहनिर्माण विभागाद्वारे करण्याचे निर्देश दिले.

-----------------

## नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी लाभार्थ्यांना वाटप केलेल्या गायी खरेदी प्रक्रियेची चौकशी करणेबाबत

**(१४)** * **२७५३ श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्ह्यातील एका आदिवासी लाभार्थ्याला प्रत्येकी २ गायी रुपये १,४०,००० या दराने सुमारे १०,००० गाईंचे वाटप करण्यात आले असून सदर गायी खरेदी प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे तसेच प्रत्येक लाभार्थ्याकडून रुपये २०,००० अनधिकृतरित्या घेतल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातून सदर गायी खरेदी न करता गुजरात राज्यातील लक्ष्मीखेडा (ता.निझर, जि.तापी) या कृषी उत्पन्न बाजार समिती नसलेल्या गावातून खरेदी करून वाटप करण्यात आल्या असून लाभार्थ्यांच्या पसंतीने गायी निवडून देण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन नियमानुसार गायी वाटपासाठी नंदुरबार येथे विमा कंपनी उपलब्ध असताना पुणे येथील विमा कंपनीला या योजनेसाठी विमा कंत्राट देण्यात आले तसेच नंदुरबार तालुक्याचे पशुसंवर्धन अधिकारी उपलब्ध असताना नवापूर येथील पशुसंवर्धन अधिकाऱ्यांची या योजनेसाठी नियुक्ती करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी लाभार्थ्याला वाटप करण्यात आलेल्या गाईपैकी सध्या किती गाई लाभार्थ्यांकडे शिल्लक आहेत तसेच गायींचे प्रत्यक्ष दूध उत्पादन किती आहे व या योजनेतून किती आदिवासी कुटुंबांची आर्थिक प्रगती झाली आहे,

(५) असल्यास, सदर गैरव्यवहार केल्या प्रकरणी संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) नंदुरबार जिल्ह्यात नंदुरबार तालुक्यात व नवापूर तालुक्यात एकूण १०४४० गायी आदिवासी लाभार्थ्यांला वाटप करण्यात आलेल्या आहेत. त्यातील १०१९४ गाई शिल्लक आहेत. व २४६ गाई मृत पावलेल्या आहेत. लाभार्थी व जिल्ह्याला लागून असलेल्या दुध खरेदी करणाऱ्या संस्था यांनी दिलेल्या माहितीवरुन दुध उत्पादन खालीलप्रमाणे आहे.

| तालुक्याचे नाव | वर्ष | दुध (लिटर) |
|---|---|---|
| नवापुर | २०२२-२०२३ | १५,९५,००० |
| | २०२३-२०२४ | ३०,७१,००० |
| | २०२४-२०२५ | ३५,९९,००० |
| नंदुरबार | २०२२-२०२३ | १,१५,२४० |
| | २०२३-२०२४ | २,२१,७२० |
| | २०२४-२०२५ | ४,६०,५२८ |

उपरोक्त माहितीवरुन गाय भेटलेल्या कुटुंबांना आर्थिक लाभ झाल्याचे दिसून येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील भुयार गटार योजनेच्या कामासाठी मातीची बेकायदेशीर वाहतूक होत असल्याबाबत

**(१५) * ३५०५ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील भुयारी गटार योजनेच्या कामासाठी मातीची बेकायदेशीर वाहतूक करून रॉयल्टी बुडविण्यात आल्या प्रकरणी संबंधित ठेकेदार यांच्यावर गुन्हा दाखल करुन सदर प्रकरणात दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी करण्याचे आदेश मा.महसूल मंत्री यांनी दिल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भुयारी गटार योजनेच्या कामासाठी मातीची बेकायदेशीर वाहतूक करून रॉयल्टी बुडविणाऱ्या संबंधित ठेकेदारावर तसेच दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याकरीता शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) ठाणे महानगरपालिकेकडून केंद्र व राज्य शासनाच्या आर्थिक सहकार्यातून जेएनएनयुआरएन अंतर्गत भुयारी गटार योजनेच्या प्रकल्पामध्ये मलवाहिनी टाकण्याच्या कामात उत्खनन करून परवानगीशिवाय वाहतूक केलेल्या गौण खनिजाबाबत संबंधित ठेकेदार यांच्याविरूध्द जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक

२५/०४/२०२५ च्या आदेशान्वये रुपये ०४,७९,५९,१०४/- एवढ्या रकमेची दंडात्मक कारवाई केली आहे. सदर दंडात्मक रक्कम वसूल करण्यासाठी जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) येथील “कर्नाळा पक्षी अभयारण्यात” तीव्र पाणी टंचाई निर्माण झाल्याबाबत

**(१६)** * **२३९६ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि.रायगड) येथील प्रसिध्द असलेल्या “कर्नाळा पक्षी अभयारण्यात” सुमारे १३४ प्रजातींचे स्थानिक पक्षी तसेच ३८ प्रजातींचे स्थलांतरीय पक्षी आढळून आले असून सदर पक्षांच्या पिण्याच्या पाण्यासाठी खोदण्यात आलेल्या तीन तलावांमध्ये बदलत्या हवामानामुळे मागील काही वर्षांपासून माहे डिसेंबर नंतर मोठ्या प्रमाणात पाण्याची पातळी कमी होत असल्याने पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तलावातील गाळ हा नियमितपणे साफ न केल्याने तसेच संपूर्ण अभयारण्याकरीता फक्त एकच बोअरवेल असल्याने पाणी टंचाईची परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पनवेल (जि.रायगड) येथील कर्नाळा पक्षी अभयारण्यातील पक्षांच्या पिण्याच्या पाण्यासाठी होणारी गैरसोय टाळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) व (२) कर्नाळा पक्षी अभयारण्यामध्ये तीन तलाव असून तलावामध्ये माहे मे, २०२५ अखेरपर्यंत पाणीसाठा उपलब्ध होता.कर्नाळा पक्षी अभयारण्यामधील तलावातील गाळ काढला जातो. तसेच कृत्रिम पाणवठ्याची नियमित साफसफाई केली जाते. कर्नाळा पक्षी अभयारण्यामध्ये एक बोअरवेल व तीन विहिरी असून, उन्हाळ्यात आवश्यकतेप्रमाणे सोलर पंप व इलेक्ट्रिक पंपद्वारे पाणी कृत्रिम पाणवठ्यामध्ये भरले जाते.
(३) व (४) कर्नाळा पक्षी अभयारण्यामध्ये पक्षांची गैरसोय टाळण्यासाठी ३२ लहान व मोठे कृत्रिम बशीच्या आकाराचे पाणवठे तयार केलेले असून, माहे जानेवारी महिन्यात मजुरांमार्फत साफसफाई केली जाते. तसेच माहे फेब्रुवारी ते जून या कालावधीत मजुरांद्वारे सदर पाणवठ्यात पाणी टाकण्याचे काम केले जाते. तसेच ठिकठिकाणी सोलर पंप व इलेक्ट्रिक पंपद्वारे पाण्याचा पुरवठा केला जातो.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील वनसंपदा मानवनिर्मित वणव्यांमुळे नष्ट होत असल्याबाबत

**(१७)** * **२७३३ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील वनसंपदा धोक्यात आली असून मागील पाच वर्षांत सुमारे ३,०७१ हेक्टर वनक्षेत्राचे वणव्यामुळे नुकसान झाल्याचे व त्यामुळे जंगलातील पशुपक्ष्यांचे अस्तित्व धोक्यात आले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वणवे मानवनिर्मित असून या वणव्यांमुळे अनेक दुर्मिळ वन्यजीव व वनस्पती प्रजाती नष्ट होत असून वणवे लावणाऱ्यां विरोधात योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१), (२) व (३) रायगड जिल्ह्यात अलिबाग व रोहा हे वनविभाग असून मागील पाच वर्षात एकूण ५०१६.२५ हेक्टर क्षेत्रामध्ये २००० वणवे लागले आहेत व माहे एप्रिल, २०२५ मध्ये एकूण ४२.०० हेक्टर क्षेत्रामध्ये २७ वणवे लागले आहेत. सदर वनपरिक्षेत्रात लागलेले वणवे हे ग्राऊंड फायर स्वरुपाचे असल्याने जंगलातील पालापाचोळा, गवत जळाले आहे. या वणव्यामुळे वनसंपदा, पशूपक्षांचा अधिवास यांना धोका असल्याचे निदर्शनास आले नाही. सर्व घटनांमध्ये प्राथमिक गुन्हा नोंदविला जातो व त्यास अनुसरुन आवश्यक ती कार्यवाही केली जाते. जंगलातील आगी नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि आगीमुळे जळालेले नुकसानीचे क्षेत्र कमी करण्यासाठी आग प्रतिबंधक जाळरेषा घेण्यात येतात. आग विझविण्याकामी वन कर्मचारी स्थानिक लोकांची, स्वयंसेवी संस्थांची मदत घेऊन वनवणवा आटोक्यात आणतात.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील वन विभागाच्या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१८)** * **२९३८ श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील वन विभागात शासनाच्या विविध लेखाशिर्षाखाली तसेच जिल्हा नियोजन समितीमार्फत सन २०२० ते २०२४ या कालावधीत वितरित करण्यात आलेल्या निधीचा केवळ कागदोपत्री खर्च दाखवून गैरव्यवहार करून अनेक कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची करण्यात आल्याने उपवनसंरक्षक (पूर्व), उपवनसंरक्षक (पश्चिम) व उपवनसंरक्षक मालेगाव यांच्या कार्यक्षेत्रातील कामांबाबत शासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्या असल्याचे माहे एप्रिल, २०२५ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन विभागाच्या अंतर्गत करण्यात आलेली मृद व जलसंधारणाची कामे दर्जाहीन झाल्यामुळे वनक्षेत्रात पाण्याची साठवण क्षमतेवर परिणाम झाला असून, वन्य प्राण्यांना पिण्याच्या पाण्याचा तुटवडा जाणवत असून परिणामी, हरिण, मोर यांसारखे प्राणी पाण्याच्या शोधात शेतशिवारात जाऊन शेती पिकांचे नुकसान करीत असल्याच्या तक्रारीही प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी उपवनसंरक्षक (पूर्व), उपवनसंरक्षक (पश्चिम) व उपवनसंरक्षक मालेगाव यांच्या कार्यकाळात (सन २०२० ते २०२४) झालेल्या सर्व कामांची सखोल चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) हे खरे नाही.

नाशिक वनवृत्तांतर्गत पुर्व, नाशिक व पश्चिम, नाशिक असे दोन वन विभाग येतात. पुर्व, नाशिक वन विभागामध्ये सन २०२३ मध्ये मालेगाव उपविभागाचे समायोजन करण्यात आले आहे.

पुर्व, नाशिक व पश्चिम, नाशिक वन विभागांतर्गत माहे एप्रिल, २०२५ वा त्यासुमारास अशा प्रकारची तक्रार प्राप्त झाल्याचे निर्दशनास आलेले नाही.

जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिनांक २७/१२/२०२१ अन्वये दिलेल्या सूचनानुसार पूर्व, नाशिक वन विभागांतर्गत जिल्हा वार्षिक योजनेतील कामांची त्रयस्थ संस्थेमार्फत केलेल्या तपासणीत अनियमितता झाल्याचे आढळून आले नाही.

तसेच नाशिक पश्चिम वन विभागांतर्गत करण्यात येत असलेल्या विविध कामांबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीची दखल घेऊन वेळोवेळी चौकशी करुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

सदर दोन्ही वन विभागांतर्गत अनियमितता झाल्याचे आढळून आले नाही.

(२) हे खरे नाही.

पूर्व, नाशिक व पश्चिम, नाशिक वन विभागांतर्गत झालेल्या मृद व जल संधारण कामांमुळे वन्य प्राण्यांना पुरेसा प्रमाणात पाण्याचा साठा उपलब्ध होत असतो. त्यामुळे, अशा प्रकारच्या तक्रारीची बाब निर्दशनास आलेली नाही.

(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## शहापूर व मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील शेतकऱ्यांना भात खरेदीची रक्कम अदा केली नसल्याबाबत

**(१९)** * **३७५४ श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास महामंडळामार्फत शहापूर व मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील नऊ भात खरेदी केंद्रांमध्ये गतवर्षी एकूण १२,३६८ शेतकऱ्यांनी नोंदणी केली होती त्यापैकी केवळ २,६९३ शेतकऱ्यांना रुपये १३ कोटी ९० लाख १३ हजार ७२५ इतक्या रकमेचा भात खरेदीपोटी मोबदला वितरित करण्यात आला व उर्वरित २,८४१ शेतकऱ्यांकडून खरेदी करण्यात आलेल्या ६४,८६८ क्विंटल भाताचे सुमारे रुपये १४ कोटी ९१ लाख इतके देयक अद्याप शासनाकडून अदा करण्यात आले नसल्याची बाब दिनांक १९ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भात खरेदीपोटी रक्कम अद्याप प्राप्त न झाल्यामुळे संबंधित शेतकऱ्यांना पूर्वी घेतलेल्या कर्जाची परतफेड करता आलेली नाही आणि त्यामुळे नवीन कर्ज मिळविण्यात अडचणी निर्माण झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित शेतकऱ्यांना भात खरेदीच्या थकबाकीची रक्कम लवकरात लवकर अदा करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके :** (१) होय.

(२), (३), (४) हे खरे नाही.

याबाबत शासनास कोणतीही तक्रार प्राप्त नाही. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक सरंक्षण विभागाकडून निधी उपलबधतेनुसार शेतकऱ्यांना धानाचे चुकारे अदा करण्यात येतात. तसेच धान विक्री केलेल्या व नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांचे ७/१२ उतारे, आधार कार्ड, बँक डिटेल्स तपासून चुकारे अदा करण्यात येते. संबंधित क्षेत्रात धान विक्री केलेले एकूण शेतकरी ५५३४ असून त्यापैकी चुकारे अदा करण्यात आलेले एकूण शेतकरी ४१८४ आहेत. सदर शेतकऱ्यांना एकूण रुपये २१,९४,४०,२८६.०० एवढी रक्कम अदा करण्यात आली असून उर्वरित एकूण १३५० शेतकऱ्यांचे ७/१२ उताऱ्यांची पडताळणी करुन तसेच तहसिलदार यांचेकडून पडताळणी अहवाल प्राप्त होताच शेतकऱ्यांचे चुकारे अदा करण्यात येतील.

-----------------

## मौजा कोराडी (ता.कामठी, जि.नागपूर) येथील सुपर क्रिटिकल थर्मल पॉवर स्टेशनचा तलाव भराव टाकून बुजविण्यात आल्याबाबत

**(२०) * ३७९२ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा कोराडी (ता.कामठी, जि.नागपूर) येथील सुपर क्रिटिकल थर्मल पॉवर स्टेशनच्या गट क्रमांक ७७ व ७८ मधील सुमारे १० एकर क्षेत्रफळाच्या तलावात माती व मुरूम टाकून बुजविण्यात आल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोराडी येथील दहा एकर क्षेत्र तसेच महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कामठी येथील ४ एकर ३४ गुंठे क्षेत्र तत्कालीन राज्यपाल बनवारीलाल पुरोहित यांच्या अध्यक्षतेखालील भारतीय विद्या भवन सांस्कृतिक केंद्रास ३० वर्षांच्या कालावधीसाठी अत्यल्प दराने देण्यात आले असून गट क्रमांक ७७ व ७८ मध्ये एकूण ९५ एकर २५ गुंठे क्षेत्र जलसाठ्यासाठी पाटबंधारे विभागाकडून संपादित करण्यात आले होते त्यापैकी १० एकर क्षेत्रात माती व मुरूम भराव टाकून बुजविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी जबाबदार असलेल्या व्यक्ती, संस्था व संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) माहे मे, २०२५ वा त्यासुमारास मौजा कोराडी, ता.कामठी येथील स. नं. ७७ व ७८ मध्ये मुरूम व माती टाकून तलाव बुजविण्यात आल्याची बाब / घटना आढळून आलेली नाही.

(२) व (३) मौजा खापरखेडा, ता.कामठी येथील स. क्रं. ७८ आराजी ३८.२५ हे.आर. ही जमीन महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कंपनी मर्या. यांचे नावे असून सदर कंपनीने नोंदणीकृत दस्त क्रं. ४४७२ दिनांक ०३/११/२०१५ अन्वये भारतीय विद्या भवन संस्थेला उक्त जमिनीपैकी ४.०० हे.आर. (१० एकर) जमीन ३० वर्षाकरीता म्हणजेच दिनांक ०२/११/२०१५ ते दिनांक ०१/१२/२०४५ पावेतो भाडेपट्टयाने दिलेली असल्याने महसूली अभिलेखावरून दिसून येते.

मौजा कोराडी, ता.कामठी येथील स. क्रं. २३८ आराजी १.९४ हे.आर. (०४ एकर ३४ गुंठे) जमीन ही श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी जाखापुर यांचे नावे आहे. मा.जिल्हाधिकारी नागपूर यांचे आदेश दिनांक ०६/१२/२०१८ नुसार मौजा कोराडी येथे असलेले श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी यांचे मालकीची जमीन महाराष्ट्र शासनाचे नावे व महाराष्ट्र शासनाचे नावे असलेले सं. क्र. २३८ ही जमीन श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान कोराडी यांचे नावे अदलाबदली देण्याबाबतचा आदेश पारित करण्यात आलेला होता.

तद् नंतर सदर जमीन म्हणजेच स. नं. २३८ आराजी १.९४ हे.आर. (०४ एकर ३४ गुंठे) जमीन श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी जाखापुर यांनी नोंदणीकृत दस्त क्रमांक ९१५/२०१९ दिनांक १५/०२/२०१९ अन्वये भारतीय विद्या भवन संस्थेला ९० वर्षाकरीता भाडेपट्याने दिलेली असल्याचे महसुली अभिलेखावरून दिसून येते.

मौजा कोराडी, ता.कामठी येथील शेत स.क्र. ७७ व ७८ ही जमीन पुर्वी पेंच प्रकल्प यांचे नावाने होती. तद् नंतर मा.जिल्हाधिकारी, नागपूर यांचे दिनांक ०७/०२/२००६ चे आदेश व मा.मुख्य महाव्यवस्थापक, महानिर्मिती कोराडी, औष्णीक विज केंद्र, कोराडी यांच्या दिनांक ०२/०२/२००६ च्या पत्रान्वये कोराडी संतुलन तलाव क्र. ०३ वरील सर्व्हे क्रमांक संपादित करण्यात आली. त्यानुसार सदर जमिनीवर महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कंपनी मर्यादीत यांचे नावे दर्ज करण्यात आलेले आहे.

मौजा कोराडी, ता.कामठी येथील स.क्रं. ७७ व ७८ मधील १० एकर क्षेत्रामध्ये मुरूम व माती टाकून तलाव बुजविण्यात आल्याची बाब/घटना माहे मे, २०२५ वा त्यासुमारास आढळून आलेली नाही. तसेच याबाबतचा कुठलाही तक्रार अर्ज प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील समाज कल्याण विभागाचे तत्कालीन सहायक आयुक्त यांनी गैरव्यवहार केल्याबाबत

**(२१)** * ४००३ **श्री.दादाराव केचे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समाजकल्याण विभागाच्या नागपूर व भंडारा येथील कार्यालयात तत्कालीन सहायक आयुक्त यांनी पदाचा दुरुपयोग करून मागील सात वर्षांत कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे आरोप झाल्याप्रकरणी त्यांना निलंबित करून विभागीय चौकशी करण्याचे निवेदन लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.मंत्री (सामाजिक न्याय) यांना दिनांक २८ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास सादर केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जाती उपाययोजना (विधयो) २०२१-२२ अंतर्गत काम करताना संबंधित अधिकाऱ्यांनी शालेय गणवेश वाटप, प्रधानमंत्री गौणखनिज योजनेत ३ कोटी निधीची नियमबाह्य वळती, निविदा प्रक्रिया न राबवणे, ट्रायसिकल खरेदीत कमिशन घेणे इ. योजनांमध्ये गैरव्यवहार व अनियमितता केल्याने शासनाने दिनांक २८ एप्रिल, २०२५ रोजी आदेशान्वये प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी समितीने चौकशी अहवाल शासनास सादर केला आहे काय, अहवालात कोणत्या शिफारसी करण्यात आल्या आहेत तसेच संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर अनियमितता व गैरव्यवहार केल्याप्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

सदर प्रकरणी आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना चौकशी करुन शासनास अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे. सदरचा अहवाल शासनास प्राप्त होताच योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात पापलेट माशाच्या पिल्लांची मासेमारी रोखण्याबाबत

**(२२) * २२७१ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात पापलेट माशाचे संवर्धन करण्याकरीता शासनाने माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये ‘पापलेट’ या माशाला ‘राज्य मासा’ म्हणून घोषित केले असले तरी सद्य:स्थितीत समुद्रकिनारी पापलेट माशाच्या पिल्लांची मोठ्या प्रमाणावर मासेमारी होत असल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ एप्रिल, २०२५ रोजी लेखी निवेदनाद्वारे मा.मत्स्यव्यवसाय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे जून ते ऑगस्ट महिन्यात माशांच्या पिल्लांची पैदास होत असून सदर कालावधीत मच्छिमारांकडून पापलेट माशांच्या पिल्लांची मोठ्या प्रमाणात मासेमारी होत आहे, पापलेट माशांच्या पिल्लांची मासेमारी वेळीच रोखली गेली नाही तर ‘राज्य मासा’ म्हणून घोषित केलेल्या पापलेट माशांच्या अस्तित्वावर भविष्यात धोका निर्माण होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पापलेट माशांच्या संवर्धनासाठी व त्यांच्या पिल्लांच्या मासेमारीस आळा घालण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ (सुधारणा २०२१) अंतर्गत दिनांक ०१/०६/२०१५ च्या शासन आदेशान्वये १ जून ते ३१ जुलै हा कालावधी, पावसाळी मासेमारी बंदी कालावधी म्हणून घोषित आहे. या कालावधीत समुद्रात मासेमारी करण्यास प्रतिबंध आहे. त्यामुळे पापलेट माशांच्या पिल्लांची मासेमारी होत नाही.

(३) महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ (सुधारणा २०२१) अंतर्गत दिनांक ०२/११/२०२३ शासन आदेशान्वये माशांच्या जातीनुसार किमान कायदेशीर आकारमान निश्चित केला आहे. त्यास अनुसरुन महाराष्ट्र राज्याच्या जलधी क्षेत्रामध्ये पकडण्यात येणाऱ्या माश्यांच्या वाणिज्यिक दृष्टा महत्त्वाच्या प्रजातीमधील एक पापलेट (SILVER POMFRET) साईज (MLS) १३५ (TOTAL LENGHT) निश्चित केलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी विविध कार्यकारी संस्थेतील धान व बारदान खरेदीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२३) * ३६६४ श्री.संजय खोडके, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्रीमती चित्रा वाघ, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ उपप्रादेशिक कार्यालय, कुरखेडा (जि.गडचिरोली) अंतर्गत असलेल्या आदिवासी विविध कार्यकारी संस्था देऊळगाव केंद्रावर सन २०२३-२४ मध्ये धान व बारदान खरेदीत दीड कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे तसेच तद्नंतर सदर संस्थेत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातही पुन्हा सव्वादोन कोटी रुपयांचा आणखी एक गैरव्यवहार झाल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणात आदिवासी विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक यांनी दिनांक ९ एप्रिल, २०२५ रोजी संस्थेला "कारणे दाखवा" नोटीस बजावलेली असून प्रादेशिक व्यवस्थापकांना तेथील जिल्हाधिकाऱ्यांनी यांनी संबंधितांवर गुन्हा नोंदविण्याचे निर्देश दिलेले असतानाही अद्याप गुन्हा नोंद झाला नाही तसेच एकत्रित की स्वतंत्र गुन्हे दाखल होणार याबाबतही अस्पष्टता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त दोन्ही आर्थिक गैरव्यवहारांप्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच दोषींवर गुन्हे दाखल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके :** (१) होय.
(२) व (३) अंशत: खरे आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाकडून दिनांक ०९/०४/२०२५ रोजी संबंधित अधिकारी/कर्मचारी तसेच कार्यकारी सहकारी संस्थेचे केंद्रप्रमुख/सचिव व संचालक मंडळ यांना नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच दोषी अधिकारी/कर्मचारी यांना निलंबीत करुन त्यांच्यावर तसेच संबंधित संस्थेचे केंद्रप्रमुख/ सचिव व संचालक मंडळावर पोलीस स्टेशन कुरखेडा येथे दिनांक १९/०४/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्ह्याचा राष्ट्रीय खाद्यतेल तेलबिया अभियान योजनेत समावेश करण्याबाबत

**(२४) * ३१५१ श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात भुईमूग व इतर तेलबिया पिकांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात असूनही जिल्ह्याचा समावेश राष्ट्रीय खाद्यतेल-तेलबिया अभियान योजनेत करण्यात आलेला नाही, यासंदर्भात शेतकऱ्यांनी केंद्र शासनाकडे अकोला जिल्ह्याचा समावेश करण्याची मागणी केली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने दिनांक ७ फेब्रुवारी, २०२५ रोजी प्रसिध्द केलेल्या शासन निर्णयामध्ये अकोला जिल्हा वगळल्यामुळे येथील शेतकरी या योजनेच्या लाभांपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अकोला जिल्ह्यात सुमारे ५०,००० हेक्टर क्षेत्रावर भुईमूग लागवड केली जात असून विशेषत: अकोट व तेल्हारा तालुक्यातील मृदा भुईमूग उत्पादनासाठी अनुकूल असतानाही आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव, प्रक्रिया उद्योगाची कमी व सिंचन सुविधातील मर्यादामुळे शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पादन मिळत नाही तसेच योजनेत समाविष्ट होण्यासाठी ५०० हेक्टर पेक्षा जास्त क्षेत्रावर लागवडीचा निकष पूर्ण करत असतानाही सदर योजनेत समावेश करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अकोला जिल्ह्याचा या अभियानात समावेश करण्यासाठी जिल्ह्यातील पाणीटंचाई, खोल व चोपण मृदासंरचना, सिंचन मर्यादा व वन्यप्राणी हल्ल्यामुळे भुईमूग उत्पादनावर होणारा परिणाम लक्षात घेता जलसंधारण व संरक्षणात्मक उपाययोजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यात नव्याने राष्ट्रीय खाद्य तेल अभियान (NMEO-OS) राबविणेसाठी केंद्र शासनाच्या नवीन मार्गदर्शक सूचनांनुसार अभियान राबविण्याच्या सूचना प्राप्त झाल्या होत्या. या योजनेंतर्गत उन्हाळी हंगाम २०२४-२५ साठी केंद्र शासनामार्फत उन्हाळी भुईमूग व उन्हाळी तीळ या पिकांसाठी जिल्ह्यांची निवड करुन देण्यात आली होती. त्यामध्ये अकोला जिल्ह्याचा समावेश करण्यात आला नव्हता.त्यामुळे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अकोला यांचेमार्फत जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या निवेदनाद्वारे अकोला जिल्ह्याचा समावेश करणेबाबत विनंती करण्यात आली होती. परंतु, सदर प्रस्ताव हंगाम पूर्ण झाल्यानंतर प्राप्त झाल्यामुळे अकोला जिल्ह्याचा समावेश करण्यात आलेला नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) राष्ट्रीय खाद्य तेल अभियान (NMEO-OS) राबविणेसाठी सन २०२५-२६ मध्ये या अभियानातंर्गत २७ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला असून त्यात अकोला जिल्ह्याचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर अभियांनातर्गत सविस्तर मार्गदर्शक सूचना व जिल्हानिहाय भौतिक/आर्थिक कार्यक्रम वितरीत करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या गणवेश व नाईट ड्रेस खरेदीमध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२५) * २७५४ श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या आदेशानुसार रुपये एक कोटीपेक्षा अधिक रकमेची खरेदी दर करारावर न करता रीतसर निविदा प्रक्रिया राबवूनच करणे आवश्यक असताना सदर आदेशाचे उल्लंघन करून आदिवासी विकास विभागातर्फे रुपये ११४ कोटींची गणवेश व नाईट ड्रेस खरेदी दर करारावर करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गणवेश पुरवठा आदेशाच्या ९५ कोटींच्या फाईलवर आदिवासी विकास विभागाच्या सर्व अधिकाऱ्यांच्या दिनांक १५ मार्च, २०२४ या एकाच दिवशी स्वाक्षऱ्या झाल्या असून त्याच दिवशी शासन मान्यतेचे पत्र आदिवासी विकास आयुक्तालयाला प्राप्त होऊन सदर करारातील ७२ कोटींची देयके पुरवठादार संस्थेला अदा करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी विकास विभागातर्फे खरेदी करण्यात आलेल्या गणवेश व नाईट ड्रेस खरेदी दर करारात गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके :** (१) शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात शालेय गणवेश, पी.टी. ड्रेस, नाईट ड्रेस हे साहित्य उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ०१/१२/२०१६ रोजीच्या खरेदी धोरण व उद्योग संचालनालयाने दिनांक २७/०९/२०२३ रोजीच्या आदेशान्वये केलेल्या दर निश्चितीनुसार तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने दिलेल्या अभिप्रायाच्या आधारे रुपये १०५,८४,६३,०२९/- इतक्या रकमेच्या खर्चास दिनांक १५ मार्च, २०२४ अन्वये शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षामध्ये शासकीय आश्रमशाळा दिनांक १५/०६/२०२४ पासून सुरू होत असल्याची बाब विचारात घेऊन आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना विहित वेळेत शालेय गणवेश उपलब्ध करून देणेच्या अनुषंगाने रुपये ९५,१९,४८,५५५/- इतक्या रकमेचे आयुक्तालयामार्फत दिनांक १५ मार्च, २०२४ रोजी पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

पुरवठादार संस्थेने आवश्यक वस्तुंचा पुरवठा केल्यानुसार, त्यांनी सादर केलेल्या देयकांची रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

(३) व (४) उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ०१/१२/२०१६ रोजीच्या खरेदी धोरणातील परिच्छेद क्रमांक ५.१५ मधील तरतूदीप्रमाणे उद्योग संचालनालयाने दिनांक २७/०९/२०२३ रोजीच्या आदेशान्वये केलेल्या दर निश्चितीच्या आधारे तसेच त्या विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार शालेय गणवेश, नाईट ड्रेस व पी.टी. ड्रेस या वस्तुंचा पुरवठा करण्यात आलेला आहे. या खरेदी व्यवहारामध्ये कोणताही गैरव्यवहार झालेला नाही.

-----------------

## भामरागड (जि.गडचिरोली) तालुक्यात रोजगार हमी योजनेची कामे सुरु करण्याबाबत

**(२६) * ३५८६ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामरागड (जि.गडचिरोली) तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कामे बंद झाल्यामुळे मजुरांवर उपासमारीची वेळ आली असून सदर योजना पुन्हा सूरु करण्यात यावी याबाबत शासनाकडे मागणी केली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त आदिवासी गावांमध्ये रोजगार हमी योजनेंतर्गत कामे पुन्हा सूरु करण्याबाबत तसेच रोजगार उपलब्ध नसल्यास रोजगार हमी योजनेच्या मंजूर लाभार्थ्यांना बेकार भत्ता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांना उत्तम दर्जाची खते उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२७) * ३७५७ श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.विक्रम काळे, श्री.संजय खोडके :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण व दर्जेदार खते उपलब्ध करून देण्यासाठी राज्य व केंद्र शासनाकडून विविध उपाययोजना राबविण्यात येत असून सन २०२३-२०२४ या कालावधीत निकृष्ट दर्जाच्या खतांबाबत ३,५४७ तक्रारी तर सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात १,४३६ तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त कालावधीत शेतकऱ्यांना पुरविण्यात आलेल्या निकृष्ट दर्जाच्या खतांबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने संबंधित दोषी व्यक्ती अथवा संस्थांविरुध्द कोणती कारवाई केली तसेच राज्यातील शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण व उत्तम दर्जाची खते उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) अंशत: खरे आहे.

सन २०२३-२४ मध्ये खताच्या अनुषंगाने ३०५ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. तसेच सन २०२४-२५ मध्ये २६२ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

(२) सन २०२३-२४ मध्ये अनियमितता करणाऱ्या ३० उत्पादक/विक्रेत्यांविरुध्द पोलिसात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच सन २०२४-२५ मध्ये ३९ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत व खताच्या गुणवत्तेच्या अनुषंगाने सन २०२३-२४ मध्ये २८७ व सन २०२४-२५ मध्ये ९९ अशा एकूण ३८६ कोर्टकेस दाखल करण्यात आलेल्या आहेत.

सन २०२३-२४ मध्ये प्राप्त तक्रारीपैकी २९८ तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे. तसेच सन २०२४-२५ मध्ये प्राप्त तक्रारींपैकी २२२ तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे.

खत (नियंत्रण) आदेश १९८५ अन्वये राज्यात गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक व भरारी पथकांमार्फत बियाणे, खते व किटकनाशक विक्रेते/ उत्पादक यांची नियमित तपासणी करण्यात येते. राज्यातील शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण खत उपलब्ध करुन देताना कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या विक्रेत्यांवर विहित कार्यपध्दतीनुसार कारवाई करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांना निविष्ठा वाटप थेट लाभ हस्तांतर (DBT) प्रणालीद्वारे वितरित न केल्याबाबत

**(२८) * २८२४ श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.योगेश टिळेकर, श्रीमती चित्रा वाघ, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतकऱ्यांना मिळणारे विविध शासकीय अनुदान व मदतीच्या रकमा थेट लाभ हस्तांतर (DBT) प्रणालीद्वारे वितरित करण्याचे केंद्र शासनाचे निर्देश असतानाही, कृषी विभागामार्फत डीबीटी धोरण वगळून सुमारे रुपये २८० कोटींचा गैरव्यवहार केल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डीबीटी धोरण बदलून थेट निविष्ठा वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्याअंतर्गत नॅनो युरिया, नॅनो डीएपी, बॅटरी स्प्रे पंप, कापूस साठवणूक बॅग आदींचे वाटप करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषी विभागामार्फत डीबीटी धोरण न राबविता रुपये २८० कोटींचा गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) सन २०२३-२४ मध्ये, कापूस सोयाबीन पिकांची उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास कार्यक्रमांतर्गत थेट लाभ हस्तांतर (DBT) बाबत एक वेळची विशेष बाब म्हणून शेतकऱ्यांना वस्तू स्वरूपात लाभ देण्यास मंजूरी देण्यात आली होती.

(२) कापूस सोयाबीन पिकांची उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास कार्यक्रमांतर्गत सन २०२३-२४ साठी नॅनो युरिया, नॅनो डिएपी, मेटाल्डीहाईड, बॅटरी संचलित फवारणी पंप व कापूस साठवणूक बॅग या निविष्ठा शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्याचे निश्चित करण्यात आले होते. सदर निविष्ठा विहित निविदा प्रक्रिया राबवून शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

(३) व (४) नॅनो युरिया, नॅनो डिएपी, मेटाल्डीहाईड, बॅटरी संचलित फवारणी पंप व कापूस साठवणूक बॅग या निविष्ठा शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्याच्या प्रक्रियेबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रीट याचिका व जनहित याचिका तसेच, मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर येथे जनहित याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. तसेच, मा.लोकायुक्त यांचेकडे सुद्धा सदर प्रकरणावर कार्यवाही सुरू आहे.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.